# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सिडको भवन (दक्षिण कक्ष),बेलापूर,नवी मुंबई-400 ६१४
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६


जा.क्र.मजीप्रा/संकलन/वित्त २/विधीतज्ञ नियुक्ती/ सीआर ३५०/48 दि. 26.08.2024

## प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास A.Y २०१५-१६ (आर्थिक वर्ष २०१४-१५) करीता आयकर विभागाकडून Demand Notices प्राप्त झालेल्या आहेत. सदर नोटीसा निकाली काढणेकामी विहित पध्दतीने सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबाबत अभिप्राय दाखल करणे, प्रत्यक्ष उपस्थित राहणे इ. कामे ते पहात आहेत. उपरोक्त नमूद कालावधीकरीता प्राप्त नोटीसांचे अनुषंगाने आयकर विभागाकडे अपील दाखल करण्यात आलेले होते. मात्र आयकर विभागाने सदर अपील नाकारल्याने याबाबत मा.उच्च न्यायालय यांचेकडे अपील दाखल् करणे, सदर प्राप्त Demand Notices यावरती स्थगिती आदेश प्राप्त करून घेणे व त्यानंतर सदर प्रकरण निकाली काढण्यासाठीची आवश्यक न्यायालयीन कार्यवाही हाताळण्यासाठी सदर विषयांतील अनुभवी वकीलाची नियुक्ती करावयाची आहे. त्याकरीता खालील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या वकीलांमार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

दरपत्रके सादर करताना खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

- इच्छुक वकीलांनी त्यांचे लेटरहेडवर व्दिनोंद पध्दतीने दरपत्रके सादर करावीत.
- विधी विषयक शैक्षणिक अर्हतेचे पदवीचे प्रमाणपत्राची छायाप्रत
- Bar Council यांचेकडील ओळखपत्राची छायाप्रत
- Income Tax Appellate Tribunal तसेच उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत कमीत कमी १० वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे. तसेच यापूर्वी केलेल्या कामाचा तपशील आपल्या माहितीत नमूद करावा.
- दरपत्रके सादर करताना सादरीकरणाकरीता येणारा खर्च विचारात घेवून (टायपिंग,झेरॉक्स,प्रवास खर्च इ.) + GST स्वतंत्रपणे दर्शवून अपेक्षित दर सादर करावेत.

इच्छुक वकीलांनी सदरचे प्रसिध्दीप्रत्रक झाल्याच्या दिनांकापासून **दि : ०३.०९.२०२४ दु.०४.०० वाजेपर्यंत** दरपत्रके सादर करावीत.

(राजश्री ठोकळ)
(प्र.)संचालक (वित्त)
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई.

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई -२१ यांना माहितीस्तव.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहिस्तव :

१) उप अभियंता (आय टी सेल) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई

उपरोक्त प्रसिध्दीपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.